**सोलापूर महानगरपालिका**

दि. १६ ऑक्टोबर २०१६

**प्रेस नोट**

सोलापूर महापालिकेतर्फे डफरीन हॉस्पीटल येथे अदययावत नेत्रशस्त्रक्रिया (आय ऑपरेशन थीएटर)चे नूतनीकरण करुन त्याचा शुभारंभ प्रसिध्द नेत्रतज्ञ डॉ. तात्यासाहेब लहाने (अधिष्ठाता जे.जे हॉस्पीटल) यांचे हस्ते संपन्न झाला. महापालिकेने मागच्या महिन्यामध्ये सोलापूरच्या जनतेसाठी नेत्रशस्त्रक्रिया करण्यासाठी अदययावत ऑपरेशन थिएटर उभारण्याचा निर्णय घेतला होता. या थिएटरच्या माध्यमातून सोलापूरवासियांचे डोळयांच्या मोतीबींदूचे ऑपरेशन करण्यात येत असल्याने मोठी सेवा उपलब्ध होणार आहे. या ऑपरेशनसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही. याव्यतिरिक्त मोठया प्रमाणात ऑपरेशनची संख्या असल्यास शहरातील इतर नामवंत नेत्रचिकित्सकांची व्यवस्था करण्यात येईल. डफरील हॉस्पीटल येथे दररोज स. ९ ते ११ या कलावधीत डोळे तपासणी करुन ऑपरेशनची तारीख व वेळ देण्यात येईल. तसेच चष्म्यांचे नंबर देखील देण्यात येतील.

डॉ. लहाने यांनी या उपक्रमाचे कौतूक केले असून, शहरवासीयांना एक आवश्यक सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता – डीन श्री. डॉ. राजाराम पोवार यांनी उदघाटनप्रसंगी सांगितले की गुंतागुतीची शस्त्रक्रिया व नेत्रदान करावयाची इच्छा व्यक्त केलेल्या नागरीकांची शस्त्रक्रिया करण्याचे काम शासकिय रुग्णालयात करण्यात येईल.

या कार्यक्रमास सभागृह नेते संजय हेमगडडी, माजी सभापती बाबा मिस्त्री, मनपा आयुक्त वि.ना काळम, डॉ. पटणशेटी, डॉ. चिडगुपकर, डॉ. आडके, डॉ. जोग, नगर अभियंता चलवादी, सहाय्यक आयुक्त प्रदीप साठे, अभिजीत हराळे, श्रीमती अकुलवार, हिबारे, कारंजे, डंके उपस्थित होत तसेच इतर कर्मचारी व नागरीक उपस्थित होते.

प्रति,<br>
मा.संपादक,<br>
दैनिक

उक्त प्रेसनोट कृपया आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्दीस दयावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी,**<br>
**सोलापूर महानगरपालिका.**